नंददर्शन

# समाज जीवन जेव्हा ह्रदयातून अक्षररुप घेते तेव्हा ते सकस साहित्य ठरते - संजीव गिरासे

## सोमय्या महाविद्यालयात साहित्य अकादमीचा परिसंवाद

धुळे (प्रतिनिधी)- साहित्याच्या प्रचंड ढिगार्यात सकस साहित्य लिहिणारे साहित्यीक अगदी बोटावर मोजण्याइतके आहेत. अभ्यास, निरीक्षण, परिश्रम व प्रामाणिकपणे साहित्य सेवा करणारे साहित्यिकांची वाणवा आहे.

समाज जीवन जेव्हा ह्रदयातून, वैचारिक परिपक्वतेतून अक्षररूपाने कागदावर अवतरते, तेव्हा निर्माण झालेले साहित्य हे सकस आणि समृद्ध असते, असे मत कथा कादंबरीकार प्राचार्य संजीव गिरासे यांनी व्यक्त केले.ज्ञसाहित्य अकादमी व क जे सोमय्या महाविद्यालयातील मराठी विभाग आणि मराठी प्रबोधन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शांताबाई शेळके : व्यक्ती आणि साहित्य, या विषयावर एक दिवशीय परिसंवादातील दुसऱ्या सत्रात प्राचार्य डॉ. संजीव गिरासे बोलत होते जेष्ठ कवी अरुण म्हात्रे अध्यक्षस्थानी होते. समीक्षक डॉ. रागिनी चंद्रात्रे यांच्यासह पानिपतकार विश्वास पाटील साहित्य अकादमीचे सचिव श्रीनिवासराव, साहित्य अकादमीचे केंद्रीय सदस्य डॉ. नरेंद्र पाठक, मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव बळीराम गायकवाड, कवी अशोक बागवे, प्राचार्य किशोर पवार, ओम नागर, कवी प्रवीण दवणे, किरण डोंगरदिवे, डॉ. सुनीता सांगोले, ऍड बलदेव राजपूत यांच्यासह साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कवयित्री शांताबाई शेळके यांनी आपल्या कथा, कादंबरी, काव्य, ललित गद्य आणि चित्रपट गीतातून सामाजिक परंपरा, सण, उत्सव चित्रित करताना समाजभान पाळलेले आहे. समाजाचा परीघ, समाजाची चौकट त्यांच्या साहित्यातून अबाधित राहिल्यामुळे त्यांचे साहित्य हे तत्कालीन समाजाचा शोध घेण्यासाठी उपयुक्त ठरते. यावेळी डॉक्टर रागिनी चंद्रात्रे यांनी कवयित्री शांताबाई शेळके यांच्या कवितेतील स्त्री जीवन अत्यंत समर्पक शब्दात मांडले. कवी अरुण म्हात्रे यांनी देखील शांताबाई शेळके यांच्या कवितेतील विविध रूपे, प्रतीके, प्रतिमा व निसर्ग यांची अभ्यासपूर्ण मांडणी करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीरा कुलकर्णी यांनी केले तर मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक अभिजीत देशपांडे यांनी आभार मानले.

